लोकमत

# शरीरातील पेशींचे कार्य जाणून घेण्याची विद्यार्थ्यांना संधी

पुणे : आपले शरीर पेशींनी (सेल) तयार झालेले आहे. दररोज अनेक पेशी मृत पावतात आणि नवीन तयार होतात. ही प्रक्रिया शरीरात सातत्याने सुरु असते. विविध प्रकारच्या पेशींचे काम काय, स्टेम सेल काय करते आदी माहिती विद्यार्थ्यांना 'लेट्स रिजनरेट, द एक्सायटिंग लाइफ ऑफ अ स्टेम सेल' या व्याख्यानातून जाणून घेता येणार आहे. येत्या २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता व्याख्यान होणार असून, डॉ. दीपा सुब्रमण्यम मार्गदर्शन करणार आहेत.

आयसर, पुणे आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे हा कार्यक्रम होत आहे. गेल्या दहा वर्षांपासून विज्ञान विषयावर जनजागृती करण्यासाठी उपक्रम घेण्यात येतात. या कार्यक्रमात सातवी आणि दहावीचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. यात सर्वांना सहभागी होता येणार असून, कार्यक्रम मोफत आहे. पाषाण येथील डॉ. होमी भाभा रोडवरील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रीसर्चमध्ये कार्यक्रम होईल.

Hello Pune
Page No. 8 Feb 22, 2019
Powered by: erelego.com